**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.२०/०५/२०१८**

**दि.१९/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १४३/१८,भादविक ३०७,३२३,३५२,५०४,५०६,३४,महा.पोलिस अधि.कलम ३७(१)सह १३५,आर्म ॲक्ट ४सह (२५) |
| **फिर्यादी** | सोमनाथ खंडागळे,वय-४१ वर्षे,रा.केळेवाडी,शास्त्रीनगर,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/२०१८ रोजी २०/३० वा. फिर्यादी यांचे राहाते घरी स.नं.४४,इंदिरापार्क,केळेवाडी शास्त्रीनगर,कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी पुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरूण संजय ऊर्फे बाळु वाघमारे याने फिर्यादी यांना बाहेर बोलावुन घेवुन,तु माझा भाचा गोपाळ यास का मारले असे म्हणुन त्याने त्याच्या हातातील तलवारीने फिर्यादी यांना जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे डोक्यावर वार केला. त्यावेळी फिर्यादी यांनी तो चुकवत असताना,त्यांचे उजव्या पायाच्या मांडीवर उलटया तलवारीचा मार बसुन त्यांना मुक्का मार लागला आहे. तसेच फिर्यादी यांची मुलगी भांडणे सोडविण्यास मध्ये आली असता,त्याने तीचेही अंगावर तलवार घेवुन इतरांनी फिर्यादी यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण शिवीगाळ करुण जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एम.व्ही.राऊत ९८२२४६५६७८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १३६/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | संजय काळे,पोलीस हवालदार, दिघी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | टेम्पो ट्रकवरील अज्ञात चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी १६/०० वा. आळंदी-पुणे रोडने दिघीकडुन पुण्याकडे जात असताना ए.आय.टी. कॉलेज गेटचे दक्षिणेस,दिघी पुणे येथे |
| **तपशिल** | दिघी पो स्टे अ.मयत रजि.नं.६६/१८,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टेम्पो ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन आपल्या बाजुचे गाड्यांना ओव्होरटेक करुन पुढे जाताना उजवीकडे रॉग साईडने येवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार टेम्पो ट्रक संदिप जनार्दन घाडगे,वय-३१ वर्ष,रा.सुताटिके,कांदळी,ता. जुन्नर,जि.पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. डी.ए.मरळे ९५९४९५६९२८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २२३/१८,भादविक ४९८(अ),३०६,३४ |
| **फिर्यादी** | शीराजुददीन मुल्ला,वय-४० वर्षे,रा.औरात(बी),जि.बिदर राज्य कर्नाटक |
| **आरोपी** | १.अफझल मेहबुब शेख,वय-२८,रा.जनवाडी,पुणे २.आरिफ मेहबुब शेख,वय-२६,रा.ओटा नं.३, पाचपांडव सोसायटी,हिरवी चाळ,जनवाडी,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी १६/३० वा.ओटा नं.३,पाचपांडव सोसायटी,हिरवी चाळ,जनवाडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण अफरिन अफझल शेख हिस तीचा पती अफझल इतरांनी आपसात संगनमत करून अफरिन हिचे लग्न झालेपासुन,तीने माहेराहुन पैसे आणण्यासाठी तीचा वेळोवेळी शारिरीक व मानसिक छळ करुन,तीस क्रुर वागणुक देवुन,अफरिन हिस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने,अफरिन अफझल शेख हिने दि.१६/०५/२०१८ रोजी गळफास घेवुन आत्महात्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी. भोसले |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १३२/१८,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | आब्बास पारेख,वय-४४,रा.पॅलेस ऑर्चिड सोसा.उंड्री,पुणे |
| **आरोपी** | एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०६/२०१२ ते दि.०२/०६/२०१७ रोजीचे कालावधीत फेअरडील ट्रेडर्स नावाचे अमुल डिस्ट्रीब्युशन एजन्सी भंगवत इस्टेट गांधी चौक,मुंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम प्रिन्स कृष्णकवल कालश याने फिर्यादी यांना अमुल डिस्ट्रीब्युशन एजन्सी मिळवुन देतो असे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,त्यापोटी फिर्यादी यांचेकडुन एकुण २५ लाख रुपये घेऊन,फिर्यादी यांना एजन्सी न देता व त्यांचे पैसे परत न करता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.जी.गवळी ८१०८५०११७७ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३१०/१८,भादविक ४०८,४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | रोहन मचे,वय-३१ वर्ष,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | याकुब हानिफ शेख,वय-२४ वर्ष,रा.स.नं.४२,मिठानगर कोंढवा-खुर्द,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/१२/२०१७ ते १४/१२/२०१७ रोजीचे कालावधीत सेल लिडर सोल्युशन प्रा.लिव्हर कंपनी कोंढवा,पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम याकुब शेख हा सेल लिडर सोल्युशन प्रा.लिव्हर कंपनी कोंढवा,पुणे येथील कंपनीत काम करीत असताना,त्याने कंपनीच्या सर्वरवरील नमुद डाटा फाईल्स स्वतःच्या ई-मेल आयडीवर पाठविल्याचे फिर्यादी यांना आढळुन आले आहे. सदर कंपनीचा डाटा याकुब याने त्याचे स्वतःचे बँकेतील खात्यात १५ हजार यु.एस. डॉलर्स अंदाजे ९.५ लाख रुपये रक्कम स्विकारून,नमुद कंपनीच्या नियमांचे उल्लंघन करुन,कंपनीची आर्थिक फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मिलींद गायकवाड ८१०८३६९२९२ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे १७५/१८,भादविक ३५३,३२३ |
| **फिर्यादी** | पो.ना.एस.एस.पाटणे, खडक पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | एक महिला,वय-२३,रा.गोखलेनगर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०१८ रोजी १३/३० वा. महाराण प्रताप उद्यान बाजीराव रोड,खडक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना,यातील नमुद महिला हि तीचेबरोबर दोन मुलांना घेवुन जात असताना,फिर्यादी यांनी तीची चौकशी करीत असताना तीने फिर्यादीस पोलीसांना आमची चौकशी करण्याचा काय अधिकार आहे असे म्हणुन त्यांना अरेरावीची भाषा करुन,फिर्यादी यांचे डोक्यात व गालावर हाताने मारहाण करुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एस.एल.चौधरी ९५५२५५६८८० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे २५५/१८,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | सौ.राधा कांबळे,वय-५२,रा.चिखली,पुणे |
| **आरोपी** | १.संजय मल्लु शिंगे,वय-४०,रा.पिंपळे-गुरव,पुणे २.रशिद उर्फ दिलदार अहमद बडबुय्या,रा.चिखली,पुणे (अटक) ३.मित्तल इन्फ्रान्स्टक्चर प्रा.लिमी. चे मालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/२०१८ रोजी ०४/०० वा. हॉट फुट स्पोर्ट ॲकेडेमी साईट मारूंजी,ता.मुळशी,जि. पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी त्यांचे हॉट फुट स्पोर्ट ॲकेडेमी साईट मारूंजी,ता.मुळशी,जि.पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन उंचीवरील लोखंडी अँगलचे काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील कामगार दत्ता अशोक कांबळे,वय-३२,रा.चिखली,पुणे हा २५ फुट उंचीवर काम करीत असताना,त्याचा तोल जावुन,तो वरून खाली पडुन,दत्ता कांबळे याचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन तो मयत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आबनावे ८३२९४२७०८८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**